सांगली जिल्हयातील बत्तीस शिराळा गावातील नागपंचमी सण साजरा करण्यासंदर्भात अभ्यास समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बैठक-०७१५/प्र.क्र.२५१/फ-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १२.०९.२०१७.

वाचावे:- १. शासन निर्णय क्रमांक : एस-३०/२००२/प्र.क्र.१९५/फ-१ दिनांक २८.०७.२००८.

प्रस्तावना :

बत्तीस शिराळा नागपंचमी सण साजरा करण्याच्या अनुषंगाने जनहित याचिका क्र. ६२/२००२ व रिट याचिका क्र ३६५/२००३ मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उक्त शासन निर्णयाव्दारे अपर मुख्य सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचे बैठकांमध्ये अल्पकालीन व दिर्घकालीन उपाययोजनांबाबत विचार विनिमय करण्यात आला. तसेच अपर मुख्य सचिव (वने) यांनी सुचविल्यानुसार जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सबंधितांचा समावेश असलेली एक समिती स्थापन करुन नागपंचमी सण साजरा करण्यासाठी बैठकांचे आयोजन करण्यात आले. तथापि सदर बैठकीत या प्रकरणी सर्व सहमती होऊ शकली नाही.

सदर प्रकरणी तोडगा काढण्याकरीता बत्तीस शिराळा गावामध्ये नागपंचमी सण साजरा करण्याच्या प्रथेकडे सकारात्मक दृष्टीकोणाने विचार करुन, परंपरा व वन्यजीव अधिनियमान्वये सदर प्रकरणी असलेले निर्बधांमध्ये समन्वय स्थापित करण्याच्या अनुषंगाने सुवर्णमध्य निश्चित करण्याकरिता अभ्यास समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

बत्तीस शिराळा गावामध्ये नागपंचमी सण साजरा करण्याच्या प्रथेबाबत सकारात्मक दृष्टीकोनाने विचार करुन, परंपरा कायम ठेवण्यासाठी तसेच वन्यजीव अधिनियमान्वये सदर प्रकरणी असलेले निर्बधांबाबत अभ्यास करुन, बत्तीस शिराळा गावातील ग्रामस्थांना नागपंचमी सण साजरा करण्याचे अनुषंगाने सुवर्णमध्य निश्चित करण्याकरिता खालीलप्रमाणे अभ्यास समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव / पद	पदनाम
१	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई	अध्यक्ष
२	श्री. शिवाजीराव नाईक, विधान सभा सदस्य, ता. शिराळा.	सदस्य
३	मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर	सदस्य
४	जिल्हाधिकारी, सांगली	सदस्य
५	पोलिस अधिक्षक, सांगली	सदस्य
६	उपवनसंरक्षक (प्रादेशिक), सांगली	सदस्य सचिव

उपरोक्त व्यवस्थापन समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील:-

१) समितीची कार्यकक्षा बत्तीस शिराळा गावातील ग्रामस्थांना नागपंचमी सण साजरा करण्यासाठी सुवर्णमध्य निश्चित करण्यापर्यंत मर्यादित राहील.

२) बत्तीस शिराळा नागपंचमी सण साजरा करण्याचे अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णयान्वये गठीत समितीव्दारे करण्यात आलेल्या कार्यवाहीची पुनरावृत्ती न करता सर्व संबंधितांसह विचार विनिमय करुन सुवर्णमध्य निश्चितीबाबत प्रस्ताव व सूचना सदर समिती प्रधान मुख्य वन्यजीव रक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना पाठवेल व आवश्यक प्रकरणी त्यांचे मार्गदर्शन घेईल.

३) बत्तीस शिराळा नागपचंमी सणाचे अनुषंगाने सुवर्णमध्य निश्चित करतांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ व इतर वनविषयक कायद्यांचा व अधिनियमांचा भंग होणार नाही याबाबत समिती दक्षता घेईल.

सदर समिती त्यांचा अहवाल ३ महिन्यात शासनास सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१२५२५८१२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2017.09.14 17:35:41 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने),
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
४. श्री. शिवाजीराव नाईक, विधान सभा सदस्य, ता. शिराळा
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर.
६. जिल्हाधिकारी, सांगली.
७. पोलीस अधिक्षक, सांगली
८. उप वनसंरक्षक (प्रादेशिक), सांगली
९. वनकक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०.फ-१ कार्यासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मंत्रालय, मुंबई-३२.